रे. मु. क्र. ७८/२०१३

**<u>: निशाणी ५१ वर आदेश :</u>**

(CNR No. MHAK07-0008872013)

१. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ सहकलम १५१ प्रमाणे कैफियत दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ व २, जे प्रतिवादी क्र. ३ व ४ चे आईवडील होते, ते मयत झाले आहेत. दावामिळकती हया वादी प्रतिवादीच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. मोतीराम यांनी प्रतिवादीचे हक्क डावलून वादीच्या लाभात बक्षिसपत्र करुन दिले आहे परंतु प्रतिवादींचा सदर मिळकतींमध्ये जन्मापासून हिस्सा आहे. सदर बक्षिसपत्र प्रतिवादींवर बधनकारक नाही. सदर वडिलोपार्जित मिळकतींपैकी काही मिळकती दाव्यात सामील केलेल्या नाहीत. सदर तथ्ये कैफियतीत नमुद करणे न्यायाच्या हितास्तव राहून गेले. सदर नियोजीत दुरूस्ती ही पुर्वीच्या वादकथनांशी निगडीत आहे.

३. वादीने सदर अर्जास विरोध करून म्हटले की, पूरावा सुरु झाल्यानंतर सदर अर्ज दाखल केल्याने बेकायदेशीर आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी खालील प्रश्ने उपस्थित होत असून त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| | **प्रश्ने** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | नियोजित दुरुस्ती ही दाव्यातील वादाचे निराकरण करण्याकरीता आवश्यक आहे का? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | नियोजित दुरुस्ती मंजुर होउन मिळण्यास प्रतिवादी पात्र आहे का? | होकारार्थी |
| ३. | अंतिम आदेश काय? | अर्ज मंजूर करणेत आला. |

## : का र ण मी मां सा :

५. **प्रश्ने नं. १ व २ बाबत** :- प्रतिवादीचे अर्जातील कथन व वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत दावा वादीने वाटणी, जाहीरनामा, ताबा आणि कायमस्वरुपी मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी १५ वर कैफियत दिलेली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे नंतर मयत झाले आहेत आणि प्रतिवादी क्र. ४ यांनी सदर कैफियत स्विकृत केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून अद्यापपावेतो प्रतिवादींमार्फत त्यांचा उलटतपास पुर्ण झालेला नाही. प्रतिवादींच्या कैफियतीचे अवलोकन केले असता नियोजीत दुरूस्ती ही मुळ वाद कथनांशी सुसंगत असून मुळ वादकथनांचा आणखीन खुलासा करणारी आहे. वरील परिस्थितीत प्रतिवादीस नियोजीत दुरूस्ती मंजुर केल्यास वादीला देखील आवश्यक्ता भासल्यास परीणामी दुरुस्ती करण्यास किंवा त्यास आव्हान देण्याची संधी निश्चीतच मिळणार आहे.

६. सदर नियोजित दुरुस्तीने दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसून त्यामुळे उलट दाव्यातील संपुर्ण वादाचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. सदर नियोजित दुरुस्तीने वादी यांना कोणताही बाधक परिणाम होणार नाही. सबब सदर नियोजित दुरुस्ती आवश्यक असून प्रतिवादी सदर दुरुस्ती मंजूर होवून मिळण्यास पात्र आहे. सबब प्रश्ने क्र. १ व २ यांचे उत्तर होकारार्थी असे देण्यात येते. सबब प्रतिवादींचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. प्रश्न क्र. ३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे

आदेश पारीत करण्यात येतो.

**: आ दे श :**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी वादीला रक्कम रुपये २००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करणेत येत आहे.

२) प्रतिवादींनी नियोजित दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्त कैफियतीची प्रत दाखल करावी.

CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2022.04.27 16:17:27 +0530

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक : २७.०४.२०२२. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 27/04/2022. |
| Signed by Presiding Officer on | : | 27/04/2022. |
| Uploaded on | : | 27/04/2022. |

---------------------------------------------------------------------------------------------